स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-॥ च्या अंमलबजावणी, तांत्रिक मार्गदर्शनासाठी "राज्यस्तरीय तांत्रिक समिती" गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :-स्वभामि २०२१/प्र. क्र.६३/पापु १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८/११/२०२१.

<u>वाचा :-</u>

१. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥, बाबत केंद्र शासनाच्या माहे जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचना.
२. शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि २०२०/प्र. क्र. १९०/पापु-१६, दिनांक ०२/११/२०२०.
३. शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि २०२०/प्र. क्र. ११६ /पापु-१६, दिनांक २८/१०/२०२० व दिनांक १४/०१/२०२१.

<u>प्रस्तावना</u>

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ मध्ये, वैयक्तिक/सार्वजनिक स्तरीय शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, मासिक पाळी व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, गोबरधन व मैला गाळ व्यवस्थापन, हि कामे गावस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तरावर, सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात हाती घेण्याचे नियोजन आहे. संदर्भाधीन क्रमांक १ येथील स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ च्या अनुषंगाने जुलै, २०२० मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेतील मुद्दा क्र ४.२.९ व मुद्दा क्र. ११.१ नुसार राज्य स्तरावर तांत्रिक सहाय्य यंत्रणा निवडण्याची राज्यास मुभा देण्यात आली आहे. उपरोक्त उपांगाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व समावेशक सूचना संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. वरील सर्व उपांगाची अंमलबजावणी करताना, **<u>योग्य तांत्रिक पर्यायांना मान्यता देणे</u>,** विविध यंत्रणांचे तथा तंत्रज्ञानांचे empanelment करण्यासाठी मान्यता देणे, ग्रामीण क्षेत्रास अनुरूप भौगोलिक परिस्थिती नुसार अंमलबजावणी करताना येणा-या अडचणीवर उपाययोजना संदर्भात सविस्तर चर्चा करून, योग्य तांत्रिक पर्यायाच्या प्रस्तावांना मान्यता देणे, लोकसंख्या आधारित Business Model, किमान खर्चाची देखभाल व दुरूस्ती ( O&M ) व्यवस्था प्रस्थापित करणे कामी, आवश्यक प्रस्तावांना मान्यता प्रदान करणे, याकरिता **"राज्यस्तरीय तांत्रिक समिती"**

गठीत करणे आवश्यक असल्याने, **"राज्यस्तरीय तांत्रिक समिती"** गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या उपांगाच्या अमंलबजावणी करिता, खालील प्रमाणे **"राज्य स्तरीय तांत्रिक समिती"** गठीत करण्यात येत आहे.

२. **"राज्य स्तरीय तांत्रिक समिती"** ची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | नाव व पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. | सह सचिव (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३. | युनिसेफ, या संस्थेचे तांत्रिक प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेन्ट या संस्थेचे तांत्रिक प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग (कोकण) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे | सदस्य |
| ६. | अधिक्षक अभियंता, म.नि. व सं.सं.कक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |
| ७. | राज्य अभियान संचालक, स्वभामि (नागरी), नगर विकास विभाग, मित्तल टॉवर मुंबई. | सदस्य |
| ८. | संचालक - मित्रा, नाशिक | सदस्य |
| ९. | निरी, नागपुर या संस्थेचे तांत्रिक प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | पर्यावरण नियोजन प्राद्योगिकी केंद्र ( CEPT ), अहमदाबाद या संस्थेचे तांत्रिक प्रतिनिधी | सदस्य |
| ११. | प्रकल्प संचालक, (स्वभामि) राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई | सदस्य सचिव |

३. **समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील:-**

अ) राज्य स्तरावर स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भौगोलिक परिस्थितीनुरूप योग्य तांत्रिक पर्याय निश्चिती व निवडीबाबत मार्गदर्शन करणे. तसेच त्याअनुषंगाने तांत्रिक सहाय्य यंत्रणा निश्चितीस मार्गदर्शन करणे.

ब) राज्य स्तरावर विविध संस्थाकडून empanelment साठी प्राप्त होणाऱ्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करुन अस्तित्वात असलेली लोकसंख्या भौगोलिक व आर्थिक परिस्थिती विचारात घेवून,

सदर तंत्रज्ञान वापरणे उचित होईल किंवा कसे, याबाबत निर्णय घेणे तथा त्यासंदर्भातील नियोजन प्रक्रिया सूचविणे.

क) इतर राज्यामध्ये उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा किफायतशीरपणा तसेच अंमबवजावणीसाठी लागू करावयाची शक्यता विचारात घेवून, त्यासदर्भातील नियोजन प्रक्रिया सूचविणे.

ड) स्वच्छतेसंदर्भात राज्यामध्ये वा इतरत्र लागू करण्यात आलेल्या अद्ययावत तंत्रज्ञानाचे माहिती व शिक्षण संवाद माध्यमातून प्रसिद्धी देण्यासाठी व सर्व स्तरावरील घटकांना प्रशिक्षणे देण्यासाठी सुलभ व किफायतशीर व्यवस्था लागू करणेसाठी प्रक्रिया सूचविणे.

इ) राज्यस्तरावर तथा जिल्हा स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या किंवा नियुक्त करावयाच्या व्यावसायिक संस्थांना वेळोवेळी आलेल्या अंमलबजावणी संदर्भातील अडचणीसंदर्भात उपाय सूचविणे.

ई) सदर समितीची बैठक आवश्यकतेनुसार वेळोवेळी घेण्यात यावी.

उ) आवश्यकतेनुसार समितीचा अभ्यास दौरा तसेच, क्षेत्रिय भेटी निश्चित कराव्यात. त्याअनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी करिता अनुकुल असलेले तंत्रज्ञान लागू करण्यासाठी सूचविणे.

ए) या समितीचा कालावधी हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३१/०३/२०२५ पर्यंत राहील. या समितीच्या संरचनेमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार समिती अध्यक्ष यांना राहतील.

४. वरील परिच्छेद- ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे **राज्यस्तरीय तांत्रिक समिती** बैठक, अभ्यास दौरा, क्षेत्रिय भेटी करिता येणारा खर्च, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II करिता असलेल्या लेखाशिर्षाखालील ADMINISTRATIVE CHARGES या घटकाखाली तसेच स्वच्छतेसंदर्भात राज्यामध्ये वा इतरत्र लागू करण्यात आलेल्या अद्ययावत तंत्रज्ञानाचे माहिती व शिक्षण संवाद माध्यमातून प्रसिद्धी देण्यासाठी येणारा खर्च, माहिती, शिक्षण व संवाद (Information Education & Communication) या घटकाखाली मंजूर असलेल्या निधीमधून करावा. (संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनां मधील परिच्छेद क्रमांक १५.२)

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२१११७१५२०५९०४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATIO DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea427109026728122b638d6f2cdedao
pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F
serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA8433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.11.18 11:58:48 +05'30'

(चं. कृ. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१३. उपायुक्त (विकास), सर्व.
१४. संचालक, मीत्रा -नाशिक /संचालक, नीरी-नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
१५. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक सभापती /उपसभापती, पंचायत समिती व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.
१६. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग सर्व
१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१८. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य

शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९. निवडनस्ती, पापु-१६.

सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :-संगाग्रा- २०१९/प्र. क्र. ८७ /पापु १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५/११/२०२१.

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक संग्रागा-२०१९/प्र.क्र. ८७/पापु-१६, दिनांक २३ जुलै, २०१९.

प्रस्तावना:-

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाच्या माध्यमातून, ग्रामीण जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर, उंचावण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणा-या अभियान/कार्यक्रमामध्ये ग्रामस्थांच्या सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग असावा व कार्यक्रमाचा आपलेपणा व महत्त्व पटवून देण्याकरिता, सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये सहभागी होणा-या ग्रामपंचायतींची तपासणी करण्याकरिता दरवर्षी स्पर्धेचे निकष निर्धारित करण्यात येवून, त्याप्रमाणे शासन स्तरावरून शासन निर्णय निर्गमित करण्यात येतात. त्याप्रमाणे सन २०१९-२० करिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये मार्च २०२० पासून कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने निर्बंध व बंधने निश्चित करण्यात आली असल्याने, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षामध्ये, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आलेले नाही. त्यामुळे दिनांक २३/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये, निर्धारित केलेल्या निकषानुसार, सन २०२०-२१ ते सन २०२१-२२ या दोन वर्षाच्या कालावधीकरिता एकत्रित एक स्पर्धा घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

त्यास अनुसरून दिनांक २३/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये, निर्धारित केलेले निकष विचारात घेवून, सन २०२०-२१ ते सन २०२१-२२ या वर्षाकरिता एकत्रित एक स्पर्धा घेण्यात यावी.

२. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत समितीची रचना, कार्यपद्धती, तपासणी, निकष व बक्षिसांची रक्कम हि दिनांक २३/०७/२०१९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार राहील.

३. महाराष्ट्र राज्यामध्ये कोरोना सदृष्य परिस्थिती असल्याने, दिनांक २३/०७/२०१९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती, जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती, अभियानाकरिता आवश्यक बैठका घेणे शक्य नसल्याने, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत, स्पर्धेचे आयोजन, तपासणी, निकाल व सोहळा याबाबत खालील कोष्टकामध्ये नमूद केलेला कालावधी विचारात घेण्यात यावा.

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १. | उत्कृष्ट प्रभाग स्पर्धा | दि. ०१/१२/२०२१ ते १०/१२/२०२१ |
| २. | जिल्हा परिषद गट स्तर स्पर्धा | दि. ११/१२/२०२१ ते १०/०१/२०२२ |
| ३. | जिल्हा स्तर स्पर्धा | दि. ११/०१/२०२२ ते ३०/०१/२०२२ |
| ४. | विभाग स्तर स्पर्धा | दि. ०१/०२/२०२२ ते २८/०२/२०२२ |

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२१११२५११३९४३६१२८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT
KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=[illegible]
[illegible], pseudonym=[illegible]
serialNumber=[illegible]
[illegible], cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.11.25 13:32:10 +05'30'

( चं. कृ. मोरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. सहसचिव तथा अभियान संचालक (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.
७. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
८. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१०. उपायुक्त (विकास), सर्व.
११. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
१२. कार्यासन (पापु-१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई (निवडनस्ती)

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥ अंतर्गत, वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनबाबत गाव निवडीचे निकष व सर्वसाधारण कार्यालयीन पद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांक :-स्वभामि २०२१/प्र. क्र. २७२ (१)/पापु- १६

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २६ /११/२०२१.

वाचा:-

१) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥, बाबत केंद्र शासनाच्या माहे जुलै २०२० च्या मार्गदर्शक सूचना.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : स्वभामि-२०१९/ प्र. क्र.१४१/ पापु-१६, दिनांक १९ जुलै, २०१९.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि-२०२०/ प्र. क्र.११६ / पापु- १६, दिनांक २८/१०/२०२० व समक्रमांकाचे शासन शुद्धिपत्रक, दिनांक १४/०१/२०२१

४) केंद्र शासनाचे पत्र क्रं S-१८०१७/१०/२०२०- SBM-III-DDWS- Part(I) दिनांक १२/०७/२०२१.

५) केंद्र शासनाचे पत्र क्रं १५(२) FC-XV/FCD/२०२०-२५, दिनांक ०१/०६/२०२०.

६) १५ व्या वित्त आयोगाच्या बंधीत निधीच्या वापरासाठी केंद्र शासन नियमावली ( ऑगष्ट २०२१)

७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक :स्वभामि-२०२१/ प्र. क्र.२७२(भाग-१)/ पापु-१६, दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१.

प्रस्तावना:-

ग्रामीण भागातील जीवनमानाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने वैयक्तिक स्वच्छता, वैयक्तिक शौचालय, सार्वजनिक शौचालय, शाळा व अंगणवाडीमध्ये शौचालयाची सुविधा, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन इत्यादी घटकांची, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-। अंतर्गत अंमलबजावणी करून, राज्य हागणदारीमुक्त घोषित करण्यात आले आहे.

आता केंद्र शासनाने, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना राबविण्याचे प्रस्तावित केले असून, सदर योजना राज्यासाठी राबविण्याकरिता मा.मंत्रिमंडळाने दिनांक २८/०७/२०२१ च्या बैठकीमध्ये या योजनेच्या अनुषंगिक विविध बाबींसाठी मान्यता दिली आहे. मा. मंत्रिमंडळाने उपरोक्त प्रमाणे दिलेली मान्यता व केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचना विचारात घेता, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन व प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनाबाबत नवीन निकष व मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे

आवश्यक आहेत. त्यास अनुसरून, संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील, शासन निर्णय/परिपत्रकातील सुचना अधिक्रमित करून हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये उपरोक्त उपांगाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील, शासन निर्णय/परिपत्रक अधिक्रमित करून, हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन व प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणेबाबत पुढीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या विविध घटक व उपांगाचा अर्थ, संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या जुलै २०२० मध्ये निर्गमित केलेल्या सूचनांप्रमाणे घेण्यात यावा.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत गावस्तरीय उपांग- [**घनकचरा व्यवस्थापन** (Solid Waste Management-SWM), **सांडपाणी व्यवस्थापन** (Grey Water Management- GWM) **व सन २०२१ नुसार ५०० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांसाठी मैला गाळ व्यवस्थापन** (Faecal Sludge Management-FSM) ], **तालुका/जिल्हास्तरीय उपांग- [ प्लास्टिक कचरा व्यवस्थापन,** (Plastic Waste Management-PWM), **मासिक पाळी व्यवस्थापन** (Menstrual Hygiene Management-MHM) ] **व जिल्हास्तरीय उपांग- [मैला गाळ व्यवस्थापन व गोबरधन** (Galvanizing Organic Bio-agro Resources- Dhan- GOBARDHAN) ] या उपांगाची अंमलबजावणी करावयाची आहे.

२. उपरोक्त उपांगाकरिता गाव निवडीचे निकषः-

i) गावस्तरीय उपांगाकरिता नदी काठच्या वा जलाशयाच्या काठावरील गावांना प्रथम प्राधान्य द्यावे. तद्नंतर मोठया लोकसंख्येच्या गावांना प्राधान्य द्यावे.

ii) गावस्तरीय उपांगाकरिता प्रकल्प राबविण्यासाठी ग्रामपंचायतीच्या मालकीची वा शासकीय जागा तसेच तालुका/जिल्हास्तरीय उपांगाकरिता प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हापरिषदेच्या मालकीची वा शासकीय जागा असावी. तालुका/जिल्हास्तरीय उपांगाच्या प्रकल्पाकरिता ग्रामपंचायतीची जागा घ्यावयाची असल्यास, प्रकल्पासाठी जागा देण्याबाबतचे, संबंधित ग्रामपंचायतीचे हमीपत्र घ्यावे.

iii) गावस्तरीय उपांगाकरिता संबंधित गावाची ग्रामपंचायत हागणदारीमुक्त व जिल्हास्तरीय उपांगाकरिता जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती हागणदारीमुक्त म्हणून घोषित केलेल्या असाव्यात.

iv) सदर कामे सुरू करण्यापुर्वी संबंधित गावाचे व ग्रामपंचायतीचे द्वितीय पडताळणी सर्वेक्षण निर्देशित प्रणालीद्वारे पुर्ण करून झालेली असावी.

V) या योजनेअंतर्गत अंमलबजावणी करण्यात आलेल्या गावस्तरीय व तालुका/जिल्हास्तरीय उपांगाकरिता देखभाल व दुरूस्तीसाठी अनुषंगिक खर्च, अनुक्रमे ग्रामपंचायत व तालुका/ जिल्हा परिषद स्वनिधीमधून (१५ वा वित्त आयोग निधी) करण्यात येईल, याकरिता मागणीपत्र/ आराखड्यासह तसेच याबाबतच्या ठरावासह ग्रामपंचायतीने व तालुका/जिल्हापरिषदेने हमीपत्र उपलब्ध करून द्यावे.

Vi) ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ठ असलेल्या सर्व गावांचा शाश्वत स्वच्छता आराखडा तयार करून, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना ग्रामपंचायतीने सादर केलेला असावा. आराखड्यामधील (Sustainable Sanitation Plan) बाबींची पूर्तता होईल, याबाबतचे हमीपत्र ग्रामपंचायतीने द्यावे.

Vii) गावस्तरीय व तालुका/जिल्हास्तरीय उपांगाकरिता ग्रामपंचायतीमधील ज्या गावांसाठी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबवावयाच्या आहे, त्या गावांकरिता अशा प्रकारचा प्रकल्प मागील ५ वर्षामध्ये, निर्मल भारत अभियान वा स्वच्छ भारत अभियान (ग्रा) या योजनांमधून, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेपर्यंतच्या किंमतीचा प्रकल्प राबविण्यात आलेला नसावा. मात्र अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेपेक्षा कमी किंमतीचा प्रकल्प सदरच्या कालावधीत राबविला गेला असल्यास, अनुज्ञेयतेतील फरकाच्या किंमतीसाठी प्रकल्प राबविता येईल.

Viii) स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत प्रकल्प राबविण्यासाठी, संबधित गाव वार्षिक अंमलबजावणी आराखड्यामध्ये (AIP) समाविष्ठ असावे व त्यास राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीची (State Level Scheme Sanctioning Committee-SLSSC) रितसर मान्यता प्राप्त झालेली असावी.

३. उपरोक्त उपांगाकरिता निधी अनुज्ञेयता:-

I) घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन

| सन २०२१ नुसार लोकसंख्या | स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II नुसार अनुज्ञेयता | |
|---|---|---|
| | घनकचरा व्यवस्थापन | सांडपाणी व्यवस्थापन |
| ५००० पर्यंत | रू ६०/- प्रति व्यक्ती | रू २८०/- प्रति व्यक्ती |
| ५००० पेक्षा जास्त | रू ४५/- प्रति व्यक्ती | रू ६६०/- प्रति व्यक्ती |

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II नुसार अनुज्ञेयतेमधून, उपांगासाठी लागणारी मजूरी, **( स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II संदर्भातील केंद्र शासन मार्गदर्शक सूचना मधील परिच्छेद १५.२.(II) (a) ) ( १५ वा वित्त आयोग/ मनरेगा / ग्राप स्वनिधी/इतर)** वजावट करून निधी प्रत्यक्षात अनुज्ञेय असेल. अशा प्रकारे परिगणीत केलेल्या निधीपैकी ( जर गावाकरिता एकंदर अनुज्ञेयता, रू. ०.५० लक्ष पेक्षा कमी असेल तर, किमान एकंदर अनुज्ञेयता रु. ०.५० लक्ष समजावी ) ७०% निधी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II (केंद्र ६०% व राज्य ४०% ) अंतर्गत व उर्वरित ३०% निधी १५ व्या वित्त आयोगातून अनुज्ञेय राहील. सदर निधी अनुज्ञेयता गावाच्या सन २०२१ च्या लोकसंख्येसाठीच्या सार्वजनिक उपांगाकरिता अनुज्ञेय राहील. ( केंद्र शासनाचे पत्र क्र : S-११०१५/१/२०२०- SBM-DDWS, दिनांक २८/०५/२०२० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन २०२१ ची लोकसंख्या परिगणना करून घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाकरिता निधी अनुज्ञेयतेसाठी गृहीत धरावी.- याकरिता "प्रपत्र-१४" नुसार गणना करता येईल. )

**II) मैला गाळ व्यवस्थापन:- प्रति व्यक्ति रूपये २३०/ या दराने**

**III) प्लास्टिक कचरा व्यवस्थापन:- प्रत्येक तालुक्यामध्ये एका युनिट करिता रू. १६ लक्ष.**

**IV) गोबरधन:- प्रत्येक जिल्ह्याकरिता रू. ५० लक्ष.**

४. उपरोक्त उपांगाकरिता कार्यपध्दती:-

I) अभियान कालावधीमध्ये राज्यातील सर्व गावांसाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत विविध उपांगाची अंमलबजावणी करण्यासाठी, गावनिहाय सविस्तर प्रकल्प आराखडा (Village action Plan-VAP) तयार करावा. गावस्तरीय प्रकल्पाबाबत, ग्रामपंचायतीने व तालुका/ जिल्हास्तरीय प्रकल्पाबाबत जिल्हा परिषदेने केंद्र शासनाच्या विविक्षित या संकेतस्थळावर गावनिहाय आराखडयाची माहिती भरावी ( संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक

सूचनांमधील परिच्छेद क्रमांक ९.१ ). जिल्ह्यातील सर्व गावस्तरीय आराखड्याच्या आधारे जिल्हास्तरीय स्वच्छता आराखडा

( District swachhata Plan-DSP) तयार करावा. राज्यातील सर्व जिल्ह्यांचा जिल्हास्तरीय स्वच्छता आराखडा विचारात घेवून, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अभियान कालावधी करिता, राज्याचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा ( Project Implementation Plan-PIP ) तयार करावा. राज्याच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, सदर आराखड्यातील समाविष्ठ गावांसाठी, जिल्ह्यांद्वारे हाती घ्यावयाच्या कामांसाठी गावे निवड करून, वार्षिक वित्तिय वर्षाकरिता वार्षिक कृती आराखडा ( Annual Action Plan-AIP ) तयार करावा. सदर वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, सदर वार्षिक कृती आराखड्यास, राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीने मान्यता प्रदान केल्यानंतर, वार्षिक कृती आराखड्यानुसार समाविष्ठ गावांसाठी अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन करण्यात यावे.

II) गावस्तरीय उपांगासाठी, उपरोक्त अनुक्रमांक २ मध्ये नमूद निकषांची पुर्तता करणा-या गावाच्या बाबतीत संबधित ग्रामपंचायतीने, ग्रामसभेच्या विहित ठरावासह, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांचेकडे गावनिहाय स्वतंत्र अर्ज करावा. तालुका/जिल्हास्तरीय उपांगासाठी जिल्हापरिषदेने जिल्ह्यामधील गावांची स्वच्छता सद्यस्थिती, गावांची लोकसंख्या, गावांमधील अंतर इत्यादी बाबी विचारात घेवून, सर्व गावांसाठी तालुका/जिल्हास्तरीय उपांगे राबविण्याचे नियोजन करावे.

III) संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी गावस्तरीय उपांगासाठी प्राप्त झालेल्या ग्रामपंचायत अर्जाची वरील अनुक्रमाक २ मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार छाननी करावी. ५००० पर्यंत लोकसंख्येच्या गावासाठी नियोजनाच्या विचारार्थ असलेल्या गावास, तालुक्यातील गट संसाधन समन्वयक ( BRC ) व समुह संसाधन समन्वयक ( CRC ) यांनी प्रत्यक्ष भेट देवून, आवश्यक माहिती संकलित करून, तसेच शासन निर्णयातील उपांगनिहाय तंत्रज्ञान बाबत अनुज्ञेयता विचारात घेवून, निर्देशित पद्धतीने गावातील पदाधिकारी व नागरीकांशी संवाद साधून, प्रस्तावित कामांची आवश्यकता व त्याअनुषंगाने प्रस्तावित कामांची निवड यासह प्रारूप अंदाजपत्रक व आराखडा संबधित शाखा अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, यांच्याकडे सादर करावा. शाखा अभियंता यांनी सदर प्रारूप आराखडे व माहिती तपासून, गरजेनुसार गावास प्रत्यक्ष भेट देवून, गावातील पाहणीच्या आधारे सदर प्रारूप

अंदाजपत्रक व आराखड्यामध्ये आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करून, अंतिम केलेले सविस्तर अंदाजपत्रक व आराखडा, उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, यांच्याकडे तांत्रिक मान्यता प्रक्रियेकरिता सादर करावा.

५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावाच्या बाबतीत, गावस्तरीय उपांगासाठी, संबधित शाखा अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, यांनी सविस्तर अंदाजपत्रक व आराखडा तयार करावा. सदर आराखडे तयार करताना, उपरोक्तप्रमाणे त्या त्या गावाची माहिती प्राप्त करून घ्यावी. सदर माहितीची पुर्तता करण्यासाठी, संबधित गावाची पाहणी, ग्रामस्थांसमवेत चर्चा , सल्लामसलत करावी. जिल्ह्यासाठी व्यावसायिक /तांत्रिक यंत्रणा एम्पॅनेल करण्यासाठी विविध जिल्ह्यांद्वारे करण्यात आलेली कार्यवाही विचारात घेवून, अशा एम्पॅनेलड व्यावसायिक /तांत्रिक यंत्रणा यांच्याकडून सविस्तर अंदाजपत्रक व आराखडा तयार करून घेता येईल. ज्या जिल्ह्यांनी अद्यापि व्यावसायिक /तांत्रिक यंत्रणा एम्पॅनेल करण्याची कार्यवाही केली नसेल, अशा जिल्ह्यांनी त्यांच्या जिल्ह्याकरिता व्यावसायिक /तांत्रिक यंत्रणा एम्पॅनेल करण्यासाठी शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे योग्य कार्यवाही करून, सदरील एम्पॅनेल करावयाच्या यंत्रणांना मान्यतेसाठीचा प्रस्ताव राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे सादर करावा. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर, एम्पॅनेलड केलेल्या व्यावसायिक /तांत्रिक यंत्रणा यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक व आराखडा तयार करून घेता येईल.

तसेच जिल्ह्यातील तालुका/जिल्हास्तरीय उपांगाचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडा, मुख्यालयाच्या उपविभागातील, संबधित शाखा अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, यांनी तयार करावेत किंवा जिल्ह्याद्वारे एम्पॅनेलड केलेल्या व्यावसायिक /तांत्रिक यंत्रणा यांच्याकडून सविस्तर अंदाजपत्रक व आराखडा तयार करून घेण्यात यावा. यापैकी जी जी उपांगे, ज्या ज्या गावांमध्ये घ्यावयाची आहेत, त्या त्या गावांना सदर आराखडे उपलब्ध करून घ्यावेत.

उपरोक्त प्रमाणे तयार केलेल्या सविस्तर अंदाजपत्रक व आराखड्यास, संदर्भाधीन क्रमांक ७ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे, सक्षम अधिका-यांच्या मान्यता व अंमलबजावणी संदर्भात कार्यवाही करावी.

IV) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, गावस्तरीय तथा जिल्हास्तरीय प्रकल्पासाठी अंदाजित खर्च, इतर स्त्रोताद्वारे उपलब्ध निधी, प्रकल्पांतर्गत करावयाच्या कामांचे थोडक्यात विवरण यासह, स्वच्छ भारत अभियान (ग्रा)

टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय निधी मर्यादेत असल्याचे प्रमाणित करून, निधी मागणी प्रस्ताव, प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई व सह संचालक (वित्त), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे पाठवावेत. निधी मागणी प्रस्तावात, जिल्हा परिषदांकडे स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत शिल्लक असलेला निधी नमूद करावा.

V) स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे, आर्थिक व्यवहार व सनियंत्रण फक्त सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) द्वारे करणे अपेक्षित असल्याने, निधी मागणी प्रस्तावांची प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई व सह संचालक (वित्त), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर यांनी छाननी करून, मागणी करण्यात आलेला अनुज्ञेय निधी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार PFMS द्वारा जिल्हा परिषद यांना नियत वाटप करावा.

VI) गावस्तरीय तथा तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर, प्रकल्प वित्तीय वर्षात पूर्ण करण्याची जबाबदारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, यांची राहील, तर गावस्तरीय कृतींच्या बाबतीत संबधित ग्रामपंचायत यांची राहील. गावस्तरीय, तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्पाच्या प्रगतीपथावरील कामांच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने, प्रत्यक्ष पुर्ण करण्यात आलेल्या कामाच्या मोजमापांची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये (Measurement Book) शाखा अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग (संबधित), यांनी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II व कृतीसंगमातील { मनरेगा हिस्सा वगळून, मनरेगा करिता प्रचलित पदधती नूसार कार्यवाही } कामांकरिता एकत्रितरित्या करावी. मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेतलेल्या मोजमापांवरून तयार करण्यात आलेल्या गोषवा-याची नोंद, मोजमाप पुस्तिकेत घेतांना, त्या कामाकरिता स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II व इतर निधी कृतीसंगमाची टक्केवारी व प्रत्यक्ष खर्चाची रक्कम लेखाशिर्ष स्वरूपात, निधी स्त्रोतनिहाय विभागून दर्शवावी.

VII) गावस्तरीय तथा तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्पाच्या बाबतीत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्यांच्या अधिनस्त तालुकास्तरीय उपलब्ध मनुष्यबळाच्या सहाय्याने प्रगतीपथावरील प्रकल्पांचा पाक्षिक आढावा घ्यावा. ग्रामपंचायत स्तरावरील निधीतून करण्यात येणा-या कामाचा आढावा, निधी नियतव्यय संदर्भात नियमितपणे व सातत्याने पाठपुरावा इत्यादी कार्यवाही करून, कामांना गती द्यावी. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व) यांनी, गट

विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून प्राप्त प्रगती अहवालाआधारे जिल्ह्यातील प्रगतीपथावरील प्रकल्पांचे संनियंत्रण करणे, प्रकल्पाची माहिती MIS वर नोंदविणे, प्रकल्प प्रगती रखडणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना इत्यादी बाबी पुर्ण करून घ्याव्यात. तसेच, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या कामकाजाचा प्रकल्पांच्या प्रगतीचा पंधरवाडी अहवाल, प्रत्येक महिन्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्या मार्फत राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांना पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.

VIII) अ) गावस्तरीय, तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान प्रत्यक्षात पुर्ण करण्यात आलेल्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी, त्रयस्थ यंत्रणा म्हणून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मीत्रा -नाशिक, नीरी-नागपूर, उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्था, महाराष्ट्रातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, विश्वेश्वरैय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (VRCE), कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे (COEP) व राज्यस्तरावर यासाठी वेळोवेळी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने नेमून दिलेल्या विविध यंत्रणा, यांच्याकडून उपअभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, यांनी करून घ्यावी व उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करावी. त्रयस्थ यंत्रणाद्वारे करावयाच्या कामाच्या तपासणीसाठी, स्व.भा.मि. (ग्रा) टप्पा-॥ किंमतीच्या, ०.५०% एवढी रक्कम त्रयस्थ यंत्रणा तपासणी शुल्क म्हणून अनुज्ञेय राहिल.

ब) त्रयस्थ यंत्रणा निश्चित करताना तालुके वा उपविभाग निहाय गावांचे वाटप करता येईल. गावांच्या प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशाच्या प्रती त्यांना याबाबत कार्यवाही होताच, ई-मेल मार्फत त्रयस्थ यंत्रणा पाठविण्यात याव्यात. जेणेकरून त्यांच्या मार्फत कामांची प्रत सुरूवातीपासून देखरेखेखाली राहील. त्याचीच प्रत राज्यस्तरावरून, कळविण्यात येणा-या ई-मेल वर माहितीकरिता सुद्धा पाठविण्यात यावी.

IX) गावस्तरीय व जिल्हास्तरीय विविध उपांगासाठी, जिल्हा स्तरावर एम्पॅनेल केलेल्या व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांचे सहाय्य घेता येईल. सदर व्यावसायिक संस्था यांनी प्रकल्पाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करणे, सविस्तर अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे, प्रकल्पाच्या ५ वर्षाच्या कालावधीकरिता दैनंदिन व देखभाल दुरूस्तीसाठी तांत्रिक सहाय्य प्रदान करणे, अशी कामे करणे अपेक्षित आहे. यासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा ॥ अनुज्ञेयतेसाठीच्या किंमतीच्या बाबतीत व्यावसायिक

संस्था शुल्काची अदायगी खालीलप्रमाणे व्यावसायिक संस्थाना करावी. ( स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा ॥ अनुज्ञेयतेनुसार किंमतीच्या ५% किंवा १.०० लक्ष यापैकी जी रक्कम कमी असेल ती )

"तक्ता -१"

| क्रं | व्यावसायिक संस्थाच्या कामाचे टप्पे | प्रत्यक्ष केलेल्या कामासाठी व्यावसायिक संस्था शुल्काच्या अदायगीची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | सर्वेक्षण, अदांजपत्रके व आराखडे तयार करणे. | तांत्रिक व प्रशासकिय मान्यता प्रदान केल्यानंतर एकूण अनुज्ञेय व्यावसायिक संस्था शुल्काच्या १५% रक्कम. |
| २. | कामाच्या कंत्राटदाराकडून , उपांगाच्या कामाचे पर्यवेक्षण करुन काम पुर्ण करुन घेणे. | अनुज्ञेय व्यावसायिक संस्था शुल्काच्या ७०% रक्कम. |
| ३ | कामाची समाधानकारक देखभाल व दुरुस्ती. | अनुज्ञेय व्यावसायिक संस्था शुल्काच्या १५% रक्कम. (एकुण ५ वर्षांत समान हप्त्यात विभागून) |

गावस्तरीय सर्व उपांगांच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा ॥ अनुज्ञेयतेनुसार (गोबरधन उपांग वगळून ) किंमतीच्या ५% किंवा रूपये १,००,०००/- (रूपये १ लक्ष फक्त) यापैकी जे कमी असेल त्या रकमेच्या मर्यादेपर्यंत व्यावसायिक संस्था/स्वंयसेवी संस्था यांना उपरोक्त कामांसाठी एकत्रित व्यावसायिक संस्था शुल्क अनुज्ञेय राहिल. सदरचे शुल्क हे गावस्तरीय उपांग तसेच तालुका/जिल्हास्तरीय उपांग- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व जिल्हास्तरीय उपांग- मैला गाळ व्यवस्थापन या दोन उपांगाकरिता प्रत्येकी वेगळ्याने लागू राहील.

जिल्हास्तरीय गोबरधन उपांगासाठी संदर्भाधीन क्रमांक ४ दिनांक १२/०७/२०२१ अन्वये निर्धारित करून दिल्याप्रमाणे, स्व.भा.मि. (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत ठरविलेल्या किंमतीच्या १०% तांत्रिक यंत्रणा शुल्क अनुज्ञेय राहील. इतर निधींच्या कृतीसंगमातून घ्यावयाच्या गोबरधन कामासाठी, संदर्भाधीन क्रमांक ४ दिनांक १२/०७/२०२१ च्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे, तांत्रिक यंत्रणा शुल्क अनुज्ञेय राहिल. प्रकल्पाच्या सविस्तर अंदाजपत्रक/आराखड्यामध्ये सदर तांत्रिक यंत्रणा शुल्काची तरतूद अंतर्भूत करावी. सदर तरतूद अंदाजपत्रक/आराखड्यामध्ये समाविष्ठ नसल्यास, तांत्रिक यंत्रणा शुल्क अनुज्ञेय राहणार नाही.

X) गावस्तरीय, तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्पातंर्गत झालेल्या कामाची आणि खर्चाची नोंद, विविक्षित संकेतस्थळावर करणे आवश्यक राहील. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाची माहिती, आर्थिक व भौतिक प्रगती, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा- ॥ च्या विविक्षित संकेतस्थळावर, IMIS ( Integrated Management Information System ) तसेच

जलस्वराज्य प्रकल्प अंतर्गत तयार करण्यात आलेल्या Monitoring & Evaluation Software वर नोंदविण्याची जबाबदारी, जिल्ह्याच्या सनियंत्रण व मूल्यमापन तज्ञ ( Monitoring & Evaluation Specialist ) यांची राहील. याअनुषंगाने, घनकचरा व सांडपाणी सल्लागार यांना प्रकल्पा संदर्भात आवश्यक माहिती (Data) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी, उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा,उप विभाग, यांची राहील.

XI) गावस्तरीय, तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्प कामांच्या उपांगांचा जमा खर्च व त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्या स्वाक्षरीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर व सह संचालक (वित्त), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर यांचेकडे सादर करण्याची जबाबदारी, जिल्हा पाणी व स्वच्छता समिती अंतर्गत लेखाधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

स्व.भा.मि. (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत त्या त्या वित्तिय वर्षात प्राप्त निधी, झालेला खर्च, निर्माण केलेली उपांगे, हागणदारी मुक्त झालेली गावे व केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या बाबींचा त्या जिल्ह्याकरिताचा लेखापरिक्षण अहवाल शासनास लगतच्या पुढील वर्षाच्या १५ ऑक्टोबर पर्यंत सादर करण्याची जबाबदारी, त्या त्या जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

XII) केंद्र शासनाच्या माहे जुलै २०२० च्या मार्गदर्शक सूचनांतील निर्देशानुसार, गावस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पा अंतर्गत सार्वजनिक स्तरावर गावासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या, विविध उपांगाचे त्या त्या अंमलबजावणी यंत्रणेने, तर तालुका/ जिल्हास्तरीय उपांगाचे बाबतीत, जिल्ह्याच्या सनियंत्रण व मुल्यमापन तथा माहिती व्यवस्थापन प्रणाली तज्ञ यांनी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता ) जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने, SBM PHASE II मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे GEO-TAGGING करावे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर, अंमलबजावणी यंत्रणेनी उपांगनिहाय सविस्तर माहितीदर्शक फलक गावाच्या दर्शनी भागात तसेच प्रकल्प पूर्ण केलेल्या ठिकाणी लावावेत. सदर फलकांचे SBM Phase II मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे Geo tagging करण्यात यावे. या प्रक्रियेत स्वच्छाग्रहींना आवश्यक प्रशिक्षण देवून, त्यांच्या सहभागाने GEO-TAGGING करावे.

XIII) प्रत्यक्षात पुर्ण करण्यात आलेल्या गावस्तरीय उपांगाच्या बाबतीत, अंमलबजावणी यंत्रणा ग्रामपंचायत असल्यास, ग्रामपंचायतीने व अंमलबजावणी यंत्रणा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, असल्यास,

कार्यकारी अभियंता, यांनी ( जिल्हास्तरीय उपांगाच्या देयकासह ) कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) देयकाची अदायगी PFMS द्वारा खालीलप्रमाणे करावी:-

"तक्ता-२"

| टप्पा | देयक अदायगी टक्केवारी | देयक अदायगी तपशिल |
|---|---|---|
| २ | ३ | ४ |
| प्रथम | ७०% | सदर टप्प्यामध्ये कार्यन्वयन यंत्रणेने त्यांनी केलेल्या कामाची अदायगी करण्यासाठी, उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, यांनी प्रमाणित केलेल्या ८० % काम पुर्ण झाल्याच्या मुल्यांकन दाखला दिल्यानंतर स्तंभ क्र. ३ ची अदायगी करावी. तथापि कार्यन्वयन यंत्रणेस अंतरिम अदायगी करणे आवश्यक असल्यास सदरील मुल्यांकन टक्केवारीच्या अनुषंगाने कमाल मर्यादा स्तंभ क्र. ३ विचारात घेण्यात यावी. |
| दुसरा | २० % | उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, यांनी अंतिम मुल्यांकन दाखला व कामाचा सद्यस्थिती अहवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर केल्यानंतर. |
| तिसरा | १० % | प्रत्यक्ष प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर, एक वर्षाच्या दैनंदिन देखभाल व दुरूस्ती समाधानकारकरित्या पुर्ण केल्यानंतर उर्वरित १० % रक्कम. |

**टिप:-** उपरोक्त तक्यात दर्शविलेली अदायगीची विगतवारी ही गावस्तरीय कुटुंबाच्या बाबतीत ५००० पेक्षा जास्त (सन २०२१ ) लोकसंख्या असणा-या गावांच्या बाबतीत व तालुका/ जिल्हास्तरीय उपांगाच्या बाबतीत लागू राहील. मात्र ५००० पर्यंत लोकसंख्या असणा-या गावासाठी किरकोळ स्वरूपाची कामे जसे, शोषखड्डे इत्यादी कामे करणे अपेक्षित असल्याने, अशा कामांच्या बाबतीत कामे पुर्णत्वाचा दाखला उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, यांनी दिल्यानंतर पुर्ण केलेल्या कामाची संपुर्ण अदायगी कार्यन्वयण यंत्रणेस करावी.

XIV) प्रकल्पाची कामे समाधानकारक पुर्ण झाल्याबाबत, उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उप विभाग यांनी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, गावस्तरीय प्रकल्प संबधित ग्रामपंचायतीस हस्तातंरीत करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत. गावस्तरीय, तालुका व जिल्हास्तरीय प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती व चालवण्याची ज़बाबदारी अनुक्रमे ग्रामपंचायत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यांची राहील.

XV) १५ वित्त आयोगाच्या निधीतून घ्यावयाच्या कामाच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, अंदाजपत्रकातील ज्या उपांगाच्या कामाकरिता केवळ १५ वित्त आयोगाचा १००% निधीची अनुज्ञेयता आहे, अशा उपागांच्या घ्यावयाच्या कामाबाबत अंमलबजावणी यंत्रणेने त्यांच्या स्तरावर कार्यवाही करावी. स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत राबवावयाच्या ज्या उपांगामध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत ७०% + १५ वा वित्त आयोग ३०% असा निधीचा समावेश (हिस्सा) आहे, अशा उपांगाच्या देयकांची अदायगी करताना, १५ वा वित्त आयोगाच्या निधीतून घ्यावयाच्या ३०% हिस्स्याच्या मर्यादेपर्यंतची देयके (गावस्तरीय कृतीबाबत), ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेल्या स्वनिधीतून प्राथम्याने अदा करावी. ( १५ वा वित्त आयोग व ग्रामपंचायतीच्या अन्य उपलब्ध निधीसह ) व उर्वरित स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय ७०% देयकाबाबतची अदायगी, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत ७०% निधीमधून अंमलबजावणी यंत्रणेने करावी.

XVI) वार्षिक कृती आराखड्यात, समाविष्ट असलेल्या गावासाठी, अंमलबजावणीच्या वर्षात प्रत्यक्ष प्राप्त १५ वा वित्त आयोगाचा बंधीत निधी लक्षात घेवून, १५ वा वित्त आयोगाच्या अनुषंगिक कामांसाठी नियोजन करावे. जेणेकरून १५ वा वित्त आयोगाची कामे, १५ वा वित्त आयोगाच्या प्राप्त बंधीत निधी मर्यादेत पुर्ण करता येतील व १५ वा वित्त आयोगाचा बंधीत निधी व्यपगत होणार नाही, याची दक्षता घ्यावी. स्वच्छतेकरिता प्राप्त झालेला बंधित निधी, जलजीवन अभियानाकरिता वापरला असेल तर, यावर्षी जलजीवन अभियानाच्या निधीतून त्याचे निधी समायोजन करून घेवून, सदर निधी स्वच्छतेकरिता वापरता येईल.

गाव हागणदारी मुक्त अधिक (ODF+) घोषित करण्याकरिता निवड झालेल्या गावांच्या बाबतीत, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, त्या त्या वर्षात १५ वा वित्त आयोगाचा बंधीत निधी उपलब्ध नसल्यास व स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II चा निधी जिल्ह्याकडे उपलब्ध असल्यास अशा गावांसाठी तात्पुरत्या स्वरूपात उसनवारी तत्वावर सदरचा निधी वळता करून, गावासाठीची स्वच्छतेची कामे पुर्ण करून घ्यावीत व जसा जसा १५ वा वित्त आयोगाचा बंधीत निधी उपलब्ध होईल, त्यानुसार वापरण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II च्या निधीचे समायोजन करावे.

XVII) स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या, मागील अथवा चालू वित्तिय वर्षाच्या वार्षिक कृती आराखड्याच्या ज्या गावांचा समावेश नाही, अशा सर्व गावांसाठी, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II चा निधी उपलब्ध नसला तरी, अभियान कालावधीतील आतापर्यंत १५ व्या वित्त आयोगाचा बंधीत निधी उपलब्ध झाला आहे

व पुढील प्रत्येक वर्षात सुद्धा निधी उपलब्ध होणार आहे. या निधीतून अनुज्ञेय १५ व्या वित्त आयोगाची अनुषंगिक कामे पुर्ण करून, उपलब्ध निधी खर्ची घालणे आवश्यक आहे. अशी सर्व गावे, प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार, जरी पुढील वर्षात घ्यावयाची असली, तरी अशा गावांसाठी कृतीसंगमातील विविध उपलब्ध निधीतून करावयाच्या कामाचे ( जसे १५ वा वित्त आयोग, मनरेगा इ.) सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे तयार करून घेवून, त्यांना रितसर तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देवून, त्यापैकीची १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून घ्यावयाची आहेत अशी कामे, १५ व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुर्ण करून घ्यावीत.

XVIII) केंद्र शासन मार्गदर्शक सूचना माहे जुलै २०२० अन्वये राबविलेल्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, शेतीसाठी, बागबगीचे अथवा व्यावसायिक वापरासाठी करण्याचे नियोजन आहे. तथापि, दुष्काळी क्षेत्रातील गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेवून, सांडपाण्याच्या प्रक्रिया व्यवस्थेतील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर अन्य कारणांसाठी न करता, केवळ शोष खड्डयांच्या ( सोक पिट ) माध्यमातून सदरचे पाणी थेट जमिनीत मुरवावे, जेणेकरून दुष्काळी परिसरातील पाण्याची भूजल पातळी वाढण्यास या द्वारे मदत होईल. शोष खड्डयांची कामे प्रामुख्याने मनरेगा योजनेच्या कृती संगमातून घ्यावीत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२१११२५१८००४२६५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638c6[illegible] dedad62, pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B 3FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.11.26 18:02:11 +05'30'

( चं. कृ. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. सहसचिव (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१३. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई.
१४. उपायुक्त (विकास), सर्व.
१५. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच यांना द्याव्यात.
१६. कार्यकारी अभियंता/उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग/उप विभाग सर्व
१७. संचालक, मित्रा- नाशिक/ नीरी-नागपूर/उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्था.
१८. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य/विश्वेश्वरैय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (VRCE)/ कॅालेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे (COEP).
१९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
२०. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
२१. कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. ( निवडनस्ती )

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥ अंतर्गत, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनबाबत सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :-स्वभामि २०२१/प्र.क्र.२७२ /पापु- १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२ डिसेंबर, २०२१.

वाचा

१) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥, बाबत केंद्र शासनाच्या माहे जुलै २०२० च्या मार्गदर्शक सूचना.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांक:-स्वभामि-२०२०/प्र.क्र.१७७/ पापु-१६, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांक:स्वभामि:-२०२१/प्र.क्र.२७२(भाग-१) /पापु-१६, दिनांक १८ ऑक्टोबर,२०२१.

४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक:स्वभामि:-२०२१/प्र.क्र.२७२ (१)/ पापु-१६, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१.

प्रस्तावना:-

केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ ही महत्वाकांक्षी योजना राज्यासाठी राबविण्याकरिता मा. मंत्रिमंडळाने दिनांक २८/०७/२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. मा. मंत्रिमंडळाने उपरोक्त प्रमाणे दिलेली मान्यता व केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचना विचारात घेता, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ या योजनेच्या अनुषंगाने सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन, प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन या उपांगाच्या, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, निविदा कार्यपद्धती, अंमलबजावणी यंत्रणा अनुषंगाने मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक १८/१०/२०२१ च्या शासन निर्णयान्वये तसेच गाव निवडीचे

निकष, कामकाजाची व कार्यालयीन कार्यपद्धती या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक २६/११/२०२१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, उपरोक्त उपांगाच्या अनुषंगाने सर्वसाधारण माहिती व सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यपद्धती या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रस्तावनेतील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या उपांगाच्या अनुषंगाने, सोबत जोडलेल्या विवरणपत्र- अ मधील मार्गदर्शक सूचना तसेच या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र- ब ते ड व त्यासोबतचे प्रपत्र क्रमांक १ ते १४ मधील निर्देश विचारात घेवून, आराखडा तयार करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२११२५१८००५८३९२८ असा आहे . हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea427109026722812 2b638d6f2cdedad62, pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.12.02 16:53:04 +05'30'

**(चं. कृ. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. सहसचिव (स्वभामि),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१४. उपायुक्त (विकास), सर्व.
१५. संचालक, निरी/संचालक,मीत्रा-नाशिक /संचालक,नीरी-नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
१६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व. यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.
१७.उप अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा उप विभाग सर्व
१८.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१९.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
२०.कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
( निवडनस्ती )

## विवरणपत्र-अ

## स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता मार्गदर्शिका (अभियान कालावधी-सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ करिता)

**महत्वाचे टप्पे:-**

सदर प्रकल्पाचा आराखडा दोन टप्प्यात तयार करणे अपेक्षित आहे. पहिल्या टप्प्यात पुर्व तयारी व दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष आराखडा तयार करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे अपेक्षित आहे.

**अ) पूर्वतयारी-:**

- प्रकल्पाचे आराखडे तयार करण्यासाठी, सर्व संबधितांची क्षमता बांधणी प्रशिक्षण संबंधी जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाने कार्यवाही करावी. यामध्ये तालुक्यातील गट संसाधन समन्वयक ( BRC ), समुह संसाधन समन्वयक ( CRC ), ग्रामसेवक, सरपंच व उपसरपंचाचा प्रशिक्षणार्थी म्हणून समावेश असावा.
- संबधित गट संसाधन समन्वयक, समुह संसाधन समन्वयक यांच्या कार्यक्षेत्रातील, वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ठ असलेल्या गावांना प्रत्यक्ष भेटी देण्याचे नियोजनात्मक वेळापत्रक आखण्यात यावे. त्यानुसार ग्रामपंचायतींनी सर्व संबधितांना कळवून गट संसाधन समन्वयक, समुह संसाधन समन्वयक यांनी गावभेटी दरम्यानची कार्यवाही लक्षात घेवून, त्यांना दिलेल्या प्रशिक्षणानुसार, शासन निर्णयासोबतच्या विविध प्रपत्रातील माहिती संकलित करावी.
- गावभेटींचे व चर्चेकरिता करावयाच्या गावातील बैठकीचे वेळापत्रक तयार करून ग्रामपंचायतीना, ग्रामस्थांना गावातील संस्थाना वेळापत्रक द्यावे.
- बैठकीमध्ये ग्रामपंचायत स्तरावर प्रकल्पांतर्गत घेता येणा-या कामांच्या नियोजनाची माहिती द्यावी.

- गावाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता मदत होईल, याकरिता गावातील विविध सामाजिक घटकांचा सहभाग असणा-या गटास सहभागी करावे. विशेषत: अनुसुचित जाती/ जमाती मधील महिलांना सहभागी करावे.
- ग्रामपंचायतीने प्रकल्पातील गावाची लोकसंख्या, विविध संस्था, गावातील सार्वजनिक जागा आणि अस्तित्वातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन व्यवस्था, यापूर्वी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) वा अन्य कृतीसंगमातून राबविलेल्या उपक्रमाची सांखिकीय माहिती संकलित करून आवश्यकतेनुसार ती सर्व संबधितास उपलब्ध करून द्यावी.

  ( सदर माहिती संबधित ग्रामपंचायतीकरिता तयार करण्यात आलेल्या शाश्वत स्वच्छता आराखडा व स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा- ॥ हागणदारीमुक्त अधिक (ODF + ) द्वितीय तपासणी मधील, उपलब्ध असलेली माहिती असावी.)
- आराखडा तयार करण्यासाठी सन २०२१ च्या गावाच्या लोकसंखेच्या आधारे साधारणत: ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणा-या गावांसाठी, व्यावसायिक संस्था वा अन्य तांत्रिक सहाय्य पुरविणा-या यंत्रणांचा सहभाग आवश्यक असल्यास, त्यासंदर्भातील माहिती व व्यावसायिक संस्थांना अदा करावयाच्या व्यावसायिक संस्था शुल्काची माहीती, अंदाजपत्रकात तरतूद करणेकामी माहिती संकलित करावी.

- **ब) कुटुंब, संस्थात्मक आणि सार्वजनिक स्तरीय स्वच्छतेच्या अनुषंगाने सर्वेक्षण आणि माहिती संकलन, पडताळणी आणि एकत्रिकरण:-**
  - जिल्हा/तालुका कक्ष प्रतिनिधीने जसे जिल्हास्तरीय तज्ञ, गट संसाधन समन्वयक, समुह संसाधन समन्वयक यांनी स्थानिक गटाच्या मदतीने गावाची प्रत्यक्ष माहिती प्राप्त करून घेण्यासंदर्भात, गाव भेटी दरम्यान गावफेरी व सर्वसाधारण सर्वेक्षण करावे.
  - गावातील कुटुंबे व संस्थांना ( शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र इत्यादी.) प्रत्यक्ष भेटी देवून, कुटुंब स्तरावरील घनकचरा त्याचे विभाजन व वर्गीकरण तसेच सांडपाण्याचे प्रमाण, प्रकार, अस्तित्वातील व्यवस्थापन पद्धती, योग्य

व्यवस्थापनासाठी उपलब्ध संसाधने ( जागा, पाणी, बांधकाम साहित्य इत्यादी ) यासंबंधी, माहितीचे संकलन करावे. ( प्रपत्र क्र.२ ते ५ )

- गावातील बाजार, बस थांबे आणि मोकळ्या जागा आणि सर्व सार्वजनिक ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी देवून, त्या ठिकाणी जमा होणारे घनकचरा व सांडपाणी व त्याच्या व्यवस्थेच्या अनुषंगाने, अस्तित्वातील व्यवस्थापन पद्धती व त्याची सद्यस्थिती एकत्रित करावी. (प्रपत्र क्र.६)
- माहिती पडताळणीअंती कुटुंब, संस्था आणि सार्वजनिक ठिकाणाची माहिती संकलित करावी व माहितीचे एकत्रिकरण करावे ( "प्रपत्र क्र.२" ते "५" ). विहित संकेतस्थळावर सदर विविक्षित माहिती App द्वारे भरली जाईल, याची खात्री करावी.

**क) गाव स्वच्छता सद्यस्थिती सादरीकरणः-** ग्रामपंचायत पदाधिकारी, शासकीय यंत्रणा आणि विविध सामाजिक संस्थासमवेत, एकत्रित केलेल्या माहिती बाबत सादरीकरणासह चर्चा करावी. गावाने केलेले प्रयत्न, अडचणी, अनुभव मांडण्याची सहभाग देणा-या संबधितांना संधी देवून, सक्रीय सहभागासाठी प्रवृत्त करावे.

**ड) प्रकल्प नियोजनातील तंत्रज्ञान, व्यवस्थापन समस्या व उपाययोजना:-** संकलित माहिती व त्याच्या एकत्रिकरणानंतर, सादरीकरणा दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेवून, प्रकल्प नियोजनार्थ तंत्रज्ञानाची निवड व शाश्वतता, तंत्रज्ञानासाठी उपलब्ध जागा व संसाधने, भौगोलिक परिस्थिती, निधी उपलब्धता व मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबी लक्षात घेवून, संबधित पदाधिकारी/कर्मचा-यांशी सविस्तर चर्चा करून किमान देखभाल व दुरूस्ती खर्चाचे तंत्रज्ञान, प्रकल्पासाठी सुनिश्चित करावे. असे करताना, केंद्र शासनाने https://jalshakti-ddws.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विविध मार्गदर्शक पुस्तिका, मॅन्युअल्स, टूल किट तसेच युनिसेफ व All India Local Self Government, Mumbai यांच्या सहकार्याने तयार केलेल्या, " सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन तंत्रज्ञान" मार्गदर्शिका पुस्तिकेचा संदर्भ घ्यावा. केंद्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित Compendium मध्ये नमूद केलेली अनुषंगिक तंत्रज्ञाने, संकेतस्थळावरील माशेलकर कमिटीद्वारा मान्यता

प्रदान केलेली तंत्रज्ञाने, अंमलबजावणीसाठी प्रस्तावित करता येईल. तसेच, भौगोलिक परिस्थिती आधारे जिल्हा स्तरावर प्रस्तावित केलेली किमान देखभाल दुरूस्तीचा खर्च असणारी, अन्य तंत्रज्ञान प्रस्तावित करता येईल, असे प्रस्तावित केल्यास त्यासंबधीची माहिती "प्रपत्र क्र.७" मध्ये नमूद करावी.

सध्या अस्तित्वात असलेल्या घरगुती, वैयक्तिक अथवा सार्वजनिक अशा सर्व स्तरावरील उपाययोजना, प्रकल्प व्यवस्थापनासाठी, तंत्रज्ञान किमान खर्चाचे व दैनंदिन देखभाल दृष्टीने किमान खर्चिक असणारी तंत्रज्ञाने यांचा समावेश करताना, उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, यांनी संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात याव्यात. आराखडयामध्ये तंत्रज्ञाने प्रस्तावित करण्याकरिता ग्रामपंचायतीचा शाश्वत स्वच्छता आराखडा, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेली तंत्रज्ञाने, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि युनिसेफ, मुंबई यांनी वितरीत केलेल्या "लोकाधारीत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रमासाठी सहभागी नियोजन पुस्तिका" तसेच केंद्र शासनाच्या https://jalshakti.ddws.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या SLWM Handbook/Fecal Sludge Management/ Grey Water Management/ Black Water Management या विषयाकरिता इतर अनुषंगिक पुस्तके/ मार्गदर्शक सूचना वा टूल किट, https://water.maharashtra.gov.in व www.wsso.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या डॉ. सु. वि. मापूस्कर यांचेद्वारा प्रकाशित घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन संदर्भातील पुस्तिकेचा आधार घेता येईल. ( केंद्र शासनाने नुकतेच प्रसिद्ध केलेले Manuals व Toolkits केंद्र शासनाच्या https://swachhbharatmission.gov.in/SBMCMS/ guidelines.htm व https://swachhbharatmission.gov.in /SBMCMS/ technical-notes.htm या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. केंद्र शासनाने गोबरधन कार्यक्रमाबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, अनुक्रमे https://swachhbharatmission.gov.in/SBMCMS/writereaddata/portal/...

pdf/sbm-ph-II-Guidelines.pdf व https://sbm.gov.in/gbdw२०/images /Framework/ Gobardhan__Framework.pdf या केंद्र शासनाच्या संकतेस्थळावर उपलब्ध आहेत.)

**इ) अंमलबजावणी अंतर्गत करावयाची कामे:-**

**I) घनकचरा व्यवस्थापन [विवरणपत्र-ब (अ)] :-**

सोबतच्या विवरणपत्र "ब" मधील अ येथे घनकचरा व्यवस्थापनाबाबत थोडक्यात वर्णन करण्यात आले आहे. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या "प्रपत्र-९" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II व इतर कृतीसंगमानुसार अनुज्ञेय असलेल्या निधीमधून घनकचरा व्यवस्थापनाची कामे हाती घेण्यात यावीत.

**II) सांडपाणी व्यवस्थापन [विवरणपत्र-ब (ब)] :-**

सोबतच्या विवरणपत्र "ब" मधील ब येथे घनकचरा व्यवस्थापनाबाबत थोडक्यात वर्णन करण्यात आले आहे. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या "प्रपत्र-९" व "९-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II व इतर कृतीसंगमानुसार अनुज्ञेय असलेल्या निधीमधून सांडपाणी व्यवस्थापनाची कामे हाती घेण्यात यावीत.

**III) गावस्तरीय मैला गाळ व्यवस्थापन [विवरणपत्र-ब (ड)]**

सोबतच्या "विवरणपत्र ब" मधील ड येथे मैला गाळ व्यवस्थापनाबाबत थोडक्यात वर्णन करण्यात आले आहे. मैला गाळ व्यवस्थापनांची कामे जिल्हा स्तरावर सर्व गावांसाठी राबवावयाची असून, यासाठी ५०० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या गावांकरिता, गावस्तरीय कृती म्हणून मैला गाळ व्यवस्थापनाची कामे हाती घेण्याचे नियोजन करावे. या करिता सर्व प्रथम गावातील दोन खड्ड्यांचा, एक खड्ड्याचा व सेप्टीक टॅंक असलेल्या शौचालयांची माहिती संकलित करावी. एक खड्डा शौचालयांना दोन खड्डा शौचालयांमध्ये रूपांतरीत (Retrofitting of IHHL) करण्याची कार्यवाही करावी. दोन खड्डा शौचालयातून कंपोष्ट खत निर्माण होणार असल्याने, फक्त एक खड्डा शौचालयातील मैला व सेप्टीक टॅंक शौचालयातून निर्माण होणा-या मैल्याचे गाळ व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. रेट्रोफिटींग करून एक खड्डा शौचालयांचे दोन

खड्डा शौचालयामध्ये रूपांतरीत करता येणे शक्य नसलेल्या शौचालयाची यादी ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध ठेवावी. सदर माहिती शाश्वत स्वच्छता आराखडा तयार करताना संकलित करण्यात आली आहे. तसेच यांत्रिकी उपसा पद्धतीने अशा खड्ड्यातील व सेप्टीक टँक मधील मैला उपसा करून, नजिकच्या नगरपंचायती/नगरपालिकामध्ये व तालुका/जिल्हा स्तरावरील अस्तित्वातील STP ( नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका इ.) मध्ये प्रक्रियेकरिता देण्याचे काम करणाऱ्या उद्योजकांची संपर्क क्रमांकासह यादी सुद्धा ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध ठेवावी. ग्रामपंचायतींनी अशा उद्योजकांची संपर्क क्रमांकाची यादी ग्रामस्थांना उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून गावातील सेप्टिक टँक व सिंगल पिट शौचालयाचे मैला गाळ व्यवस्थापनांतर्गत को-ट्रिटमेंट प्रक्रियेची कार्यवाही करता येईल.

अशा प्रकारे को-ट्रिटमेंट करणे शक्य नसल्यास, अशा गावातील सेप्टीक टँक व रेट्रोफिटींग शक्य नसलेले सिंगल पिट शौचालयावर आधारित लोकसंख्येसाठी (सन २०२१), स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, गावस्तरीय कृती म्हणून मैला गाळ व्यवस्थापनाच्या उपांगातंर्गत ट्रेचिंग उपांगाची कामे हाती घ्यावी. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या उपांगाच्या कामाच्या किंमतीमध्ये मैला गाळ व्यवस्थापनाच्या ट्रेचिंगच्या कामांची किंमत जोडून, एकत्रिक किंमत विचारात घेवून, कार्यवाही करावी. जेणेकरून ५०० पर्यंत लोकसंख्येसाठी गावस्तरीय कृती म्हणून मैला गाळ व्यवस्थापन ट्रेचिंग या कामाच्या माध्यमातून गावाकरिता राबविता येईल. सदर कामे घेताना केंद्र शासनाने निर्गमित केलेली नियमावली (मॅन्युअल) व टुल किटचा वापर करावा.

गावस्तरीय कृती म्हणून ५०० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, मैला गाळ व्यवस्थापनांतर्गत, ट्रेचिंगची कामे स्वच्छ भारत अभियान (ग्रा), टप्पा-II अनुज्ञेय निधीमधून, रेट्रोफिटिंग- एक खड्ड्याच्या शौचालयाचे दोन खड्ड्यांच्या शौचालयात रूपांतर ( १५ वित्त आयोग निधी ) व ट्रेचिंग व्यवस्थापन देखभाल व दुरूस्ती ( ग्रामपंचायत स्वनिधी / Business Model वा अन्य निधी ) ही कामे, स्वच्छ भारत अभियान (ग्रा), टप्पा-II निधी व्यतिरिक्त अन्य उपलब्ध निधीमधून, कामे हाती घेता येतील.

गावाच्या एकूण लोकसंख्येमधून (सन २०२१), कुटुंब स्तरावरील, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या नियोजित उपांगाच्या व्यवस्थेकरिताची लोकसंख्या वगळून, केवळ सार्वजनिक स्तरावरील उपाय योजनासाठीच्या लोकसंख्येसाठी मैला गाळ व्यवस्थापनाकरिताचे अनुज्ञेय अनुदान परिगणित करावे. तसेच गावस्तरीय कृती म्हणून ५०० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांसाठी मैला गाळ व्यवस्थापन, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II नुसार, केवळ सार्वजनिक उपाय योजनांना उपांगनिहाय निधी उपलब्ध होणार आहे.

**IV) तालुकास्तरीय/जिल्हास्तरीय कृती-तालुकास्तरीय मासिकपाळी व्यवस्थापन [विवरणपत्र-ब (ई).] व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन [विवरणपत्र-ब (क).] आणि जिल्हास्तरीय गोबरधन व मैला गाळ व्यवस्थापन [विवरणपत्र-ब (ड)]:-**

(A) मैला गाळ व्यवस्थापनांतर्गत प्रक्रिया व्यवस्था निर्माण करताना, गावातील शौचालयांचा प्रकार नजिकच्या अस्तित्वातील मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाची प्रक्रिय क्षमतेची उपलब्धता, गावातील सेप्टिक टँक/सिंगल पिट शौचालया मधील मैला गाळ जवळपासच्या नगरपालिका/ नगरपरिषद/ महानगरपालिकांकडील उपलब्ध मैला व्यवस्थापनाच्या माध्यमातून प्रक्रियेबाबत Co-treatment संदर्भात सांगड घालावी. सदर व्यवस्थापनांतर्गत Co-treatment पद्धतीला प्राधान्य द्यावे. Co-treatment ला वाव नसल्यास, ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांकरिता जागा उपलब्धते नुसार ट्रेचिंग/ अनप्लान्टेड/प्लान्टेड ड्राईंग बेडच्या कामासाठी अनुषंगाने कामे हाती घ्यावीत. गावाच्या लोकसंख्या आधारे केंद्रित/ विकेंद्रित पद्धतीची प्रक्रिया व्यवस्था प्रस्तावित करणेसाठी किमान खर्चाच्या देखभाल दुरूस्तीचे तंत्रज्ञान अंमलबजावणीसाठी लागू करावे.

(B) ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांकरीता मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प घेण्याकरीता जिल्ह्याने त्यांचे ॲपबेसड द्वितीय सर्वेक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यातील शाश्वत आराखडे तयार करताना संकलित केलेल्या माहितीवरून प्रत्येक तालुक्यात असलेले एक खड्डा व सेप्टींक टँक असलेल्या शौचालयांची माहिती गोळा करावी. सदर माहितीवरून त्या